

## Flag Hoisting Ceremony – 15th August, 2021

# ना.ग.आचार्य,दा.कृ.मराठे महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

■ मुंबई

चेंबूर च्या ना. ग. आचार्य आणि दा. कृ. मराठे महाविद्यालयात ७५वा स्वातंत्रदिन उत्साहात साजरा झाला. एनसीसी युनिटने मानवंदना दिली.यावेळी महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. त्यात अनाथ विद्यार्थी, एकल पालक विद्यार्थी यांचा समावेश होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी श्री. डोळस यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी कोविड संक्रमण



काळात आपले धैर्य खचून न देता आपले भविष्य साकारावे व त्या बरोबर देशाचेही नाव उज्ज्वल करावे असे त्यांनी सांगितले. तर गोवंडी पोलीस स्टेशन च्या अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्र भक्ती बद्दल मार्गदर्शन केले.

चेंबूर तुर्भे शिक्षण संस्थेचे पदाधिकारी म्हापणकर तसेच शैलेश आचार्य यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विद्यागौरी लेले, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या साबिता चोप्रा, प्रा. जयश्री जंगले, प्रा. कोकणे, प्रा. शरद दहीवाले, प्रा. प्रह्लाद आंधळे, प्रा.मृदुला वाघमारे यांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात पार पडला.

**Source: वृत्तमानस दि.17/8/2021 newspaper clip**

## ना. ग. आचार्य आणि दा. कृ. मराठे महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात

मुंबई – चेंबूर येथील ना. ग. आचार्य आणि दा. कृ. मराठे महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी एनसीसी युनिटने मानवंदना दिली. तसेच महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. कोरोना प्रतिबंधक आदेशाचे पालन करीत व सुरक्षित अंतर राखत हा सोहळा पार पडल्याचे सूत्रांनी सांगितले.

**Source: Navshakti newspaper.**